नि.फौ.ख.क्र. ३६/२०२१
सरकार वि. सुशांत करंगुटकर
निशाण क्र. ३८ इन कॅमेरा

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - संचिता संजय कांदळगावकर
वय - ४७ वर्षे
व्यवसाय - घरकाम
रा/ने - धुरीवाडा मालवण ता. मालवण जि. सिंधुदूर्ग.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१. माझे सोबत माझे पती, दोन मुले, दिर, जाऊ व त्यांची दोन मुले असे एकाच घरात वेगवेगळे राहतो. सदर घर आमचे स्वत:चे आहे. सदर घराच्या बाजूला जे रुमस आहेत ते आम्ही पर्यटकासांठी वापरतो. सुशांत करंगुटकर हे आमचे शेजारी आहेत.

२. घटनेच्या दिवशी सकाळी आमचे रोजचे काम करत होतो. सदर घटना ही १३ फेब्रुवारी २०२१ रोजी घडली होती. सदर दिवशी आम्ही सकाळी ९.३० वा. परसबागेत काम करत होतो. सदर दिवशी काम करत असताना आम्हाला आवाज आल्याने माझी जाऊ रुपा कांदळगावकर हिने मला आरोपी त्यांच्या खिडकीत उभे असल्याचे दाखविले व ते व्हीडीओ शुटींग करत होते. आम्ही काम करत असताना आमचे कपडे ओले होवू नये म्हणून आम्ही आमचे कपडे वर खेचून काम करत होतो. जाऊ व मी दोघांनी मिळून आरोपीला विचारले की, तुम्ही फोटो का काढताय. आरोपीच्या कृत्यामुळे आम्हाला लाज वाटली. आरोपी काही न बोलता आतमध्ये गेला.

३. दुसऱ्या दिवशी आम्ही परत नेहमीप्रमाणे काम करत होतो. माझ्या सासूने सांगितले की, तुम्ही इकडे तिकडे न बघता तुम्ही काम करा. परंतु आम्ही खाली वाकून काम करत असतो तसेच आमचे कपडे वर खेचलेले असल्यामुळे आम्हाला बरे वाटत नव्हते. परत आम्हाला आवाज आल्याने आमचे लक्ष खिडकीकडे गेले. आरोपी हा त्याच्या पॅन्टमध्ये हात घालून चाळे करत होतो आणि डोळयाने व तोंडाने विचित्र हावभाव करत होता. आम्ही

आरोपीचे हरकत बघून तिथे न थांबता घरात गेलो व आमच्या सासूला घडलेला प्रकार सांगितला. आम्हाला खूप गिल्टी वाटले.

४. परत काही दिवसांनी म्हणजेच दि. २१/०२/२०२१ रोजी आम्ही भांडी घासत असताना आम्हाला समोरच्या गडग्यावरच्या खांबावर कॅमेरा आमच्या कंपाउंडच्या दिशेने लावलेला दिसला. कॅमेरा बघून आम्हाला सुरक्षितता वाटत नव्हते. कॅमेरा आमच्या दिशेने आहे आणि काय काय त्यामध्ये रेकॉर्ड होते म्हणून आम्हाला सुरक्षित वाटत नव्हते. घरचे पुरुष व लहान मुले लघवीसाठी बाहेर जायचे. त्यामुळे आम्हाला भिती निमार्ण झाली होती. सदर घटनेची फिर्याद आम्ही तिसऱ्या दिवशी केली. फिर्याद माझी जाऊ रुपा सुधीर कांदळगावकर यांनी दिली होती. त्यानंतर पोलीसांनी कॅमेरा काढून पंचनामा केला. त्यानंतर आम्ही रोजच्या प्रमाणे काम करत होतो. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेलो नाही. मी आरोपीस दाखविल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.आर.के.परुळेकर यांचेमार्फत सुरु.</u>

५. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे पती सुधीर भिसाजी कांदळगावकर हे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर यांनी वकील शशी पई यांचेकडे क्लार्क म्हणून अनेक वर्षे काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, शशी पई नंतर सुधीर कांदळगावकर यांनी गोवेकर यांचेकडे अनेक वर्षे काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर यांचे कोर्टाच्या गडग्याला लागून टायपिंग सेंटर आहे. हे मला सांगता येणार नाही की, सुधीर कांदळगावकर यांना कोर्टाच्या कामकाजाची चांगली माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, झालेल्या कथीत घटनेची फिर्याद ११ दिवसानंतर देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने तिचा नवरा सुधीर याच्याबरोबर चर्चा करुन जे ठरले त्याप्रमाणे फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देताना सुधीर कांदळगावकर पोलीस स्टेशन येथे हजर होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ते नंतर आले. हे म्हणणे खरे नाही की, सुधीर कांदळगावकर यांनी पोलीसांना कथीत घटनेची सविस्तर माहिती दिली. आमची व पोलीसांनी भेट सर्वप्रथम

दि. २३/०२/२०२१ रोजी सायंकाळी झाली. आम्ही तासभर पोलीस स्टेशन येथे होतो. आम्ही त्या दिवशी पोलीस स्टेशन येथून ६.०० वा. घरी गेलो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर माझी व पोलीसांनी भेट झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला काही विचारले आणि ते लिहून घेतले असे घडलेले नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, जाऊ रुपा हिने जी तक्रारीमध्ये जे कथन केले त्याप्रमाणे पोलीसांनी माझे टिप्पण नोंदविले. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घर ते मालवण पोलीस स्टेशन हे चालत १५ मिनिटाच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथित घटनास्थळालगत हिंदळेकर टायपिंग सेंटर ते मालवण सेवांगण जाणारा मुख्य डांबरी रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्यावर लोकांची व वाहनांची ये जा सुरु असते. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या पुर्वेला संजय आचरेकर यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या उत्तरेस धुरीवाडा समुळबाग ते कन्याशाळा जाणारी पायवाट आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या पायवाटेवरुन देखील लोकांची ये जा सुरु असते. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळालागून आमचे पर्यटकांचे रुमवर पर्यटकांची ये जा सुरु असते. हे म्हणणे खरे आहे की, २०२१ साली कथीत घटनास्थळाला लावून सुधीर कांदळगावकर यांचा आइस्क्रीमचे गोडावून व विक्री सुरु होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या आइस्क्रीम गोडावून मध्ये लोकांची ये जा सुरु होती.

७. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घर मिळकत व आरोपीच्या घर मिळकतीमध्ये दगडी कुंपण आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कुंपणाला लागून आरोपीच्या मिळकतीत आरोपीची पिण्याच्या पाण्याची विहिर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कुंपणाला लागून आमच्या मिळकतीत माडाची झाडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर कुंपणाच्या आमच्याकडील बाजूस आमचे शौचालय आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ते गडग्यापासून लांब आहे. हे मला माहित नाही की, आमच्या माडाला आम्ही सांडपाणी सोडल्यामुळे आरोपीच्या विहिरीचे पाणी दुषीत होत होते त्यामुळे आरोपीने आमच्याविरुध्द मालवण नगरपरिषद कथित घटनेच्या पुर्वी तक्रारी केलेल्या होत्या. हे मला माहित नाही की, आरोपीने मालवण नगरपरिषद येथे सांडपाण्याची तक्रार केल्यामुळे मालवण नगरपरिषदचे कर्मचारी पाहणी

करण्यासाठी आमच्या मिळकतीत आले होते. हे मला माहित नाही की, दि. ०२/०२/२०२१ रोजी नगरपरिषदेचे घाटगे व वळंजू हे आमच्या मिळकतीमध्ये येवून त्यांनी पाहणी केली होती. हे मला माहित नाही की, मालन नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांनी आम्हाला पत्र देवून सांडपाणी टाकू नका, दुषित पाणी, कचरा इत्यादी टाकू नका असे लिखित कळविले होते.

८. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर यांनी आइस्क्रीम गोडावूनच्या मागे मोठा जनरेटर लावला होता. हे मला माहित नाही की, सदर जनरेटरमुळे येणारा आवाज, व धुळीबाबत आरोपीच्या कुटूंबाला त्रास होत असल्याने आरोपीने आमच्याविरुध्द मालवण नगरपरिषदेकडे तक्रार केली होती. हे मला माहित नाही की, सुधीर कांदळगावकर यांना आईस्क्रीम गोडावून साठी उच्च दाबाची विद्युत वाहिनी आरोपीच्या मिळकतीवरुन देवू नये याकरीता आरोपीने एमएसईबी यांचेकडे तक्रार दिली होती.

९. आम्ही दि. १३/०२/२०२१ रोजी ९.३० वा. परसबागेत काम करत होतो ही बाब पोलीसांना सांगितली नव्हती. मी पोलीसांना जबाब देताना " सदर दिवशी काम करत असताना आम्हाला आवाज आल्याने माझी जाऊ रुपा कांदळगावकर हिने मला आरोपी त्यांच्या खिडकीत उभे असल्याचे दाखविले व ते व्हीडीओ शुटींग करत होते '' असे सांगितले होते. सदरचा मजकूर माझ्या जबाबात का नमूद केला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देताना " आम्ही काम करत असताना आमचे कपडे ओले होवू नये म्हणून आम्ही आमचे कपडे वर खेचून काम करत होतो" ही बाब सांगितली होती. सदर बाब माझ्या टिप्पणामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना जाबाब देताना " जाऊ व मी दोघांनी मिळून आरोपीला विचारले की, तुम्ही फोटो का काढताय, आरोपीच्या कृत्यामुळे आम्हाला लाज वाटली, आरोपी काही न बोलता आतमध्ये गेला '' ही बाब सांगितली होती. सदर बाब माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

१०. मी पोलीसांना जबाब देताना " दुसऱ्या दिवशी आम्ही परत नेहमीप्रमाणे काम करत होतो. माझ्या सासूने सांगितले की, तुम्ही इकडे तिकडे न बघता तुम्ही काम करा, परंतु आम्ही खाली वाकून काम करत असतो तसेच आमचे कपडे वर खेचलेले असल्यामुळे आम्हाला

बरे वाटत नव्हते '' ही बाब सांगितली होती. सदरची बाब पोलीसांनी माझ्या जबाबात का नमूद केली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना जबाब देताना " परत आम्हाला आवाज आल्याने आमचे लक्ष खिडकीकडे गेले, आरोपी हा त्याच्या पॅन्टमध्ये हात घालून चाळे करत होतो आणि डोळ्याने व तोंडाने विचित्र हावभाव करत होता '' ही बाब सांगितली होती. सदरची बाब माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना जबाबत देताना '' आम्ही आरोपीचे हरकत बघून तिथे न थांबता घरात गेलो व आमच्या सासूला घडलेला प्रकार सांगितला, आम्हाला खूप गिल्टी वाटले '' ही बाब सांगितली होती. सदर बाब माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देताना '' परत काही दिवसांनी म्हणजेच दि. २१/०२/२०२१ रोजी आम्ही भांडी घासत असताना आम्हाला समोरच्या गडग्यावरच्या खांबावर कॅमेरा आमच्या कंपाउंडच्या दिशेने लावलेला दिसला '' ही बाब सांगितली होती. सदर बाब माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देताना " कॅमेरा बघून आम्हाला सुरक्षितता वाटत नव्हते, कॅमेरा आमच्या दिशेने आहे आणि काय काय त्यामध्ये रेकॉर्ड होते म्हणून आम्हाला सुरक्षित वाटत नव्हते '' ही बाब सांगितली होती. सदरची बाब माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देताना ''घरचे पुरुष व लहान मुले लघवीसाठी बाहेर जायचे. त्यामुळे आम्हाला भिती निर्माण झाली होती '' ही बाब सांगतली होती. सदरची बाब माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देताना " सदर घटनेची फिर्याद आम्ही तिसऱ्या दिवशी दिली '' ही बाब सांगतली होती. सदरची बाब माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

११. हे म्हणणे खरे नाही की, सांडपाणी, कचरा व दुषित पाण्याच्या कारणावरुन आरोपीचे कुटूंब व आमच्या कुटूंबामध्ये संबंध चांगले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, घराचा बाजार मी व माझी जाऊ बाजारामधून घेवून येतो. हे मला माहित नाही की, माझी जाऊ रुपा ही त्यांच्या टायपिंग सेंटरमध्ये नेहमी येते किंवा कसे.

१२. हे म्हणणे खरे आहे की, मी पहिल्यांदा कोर्टात साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीमध्ये कथनाप्रमाणे मी कोर्टात साक्ष देण्याचा प्रयत्न केला

आहे. साक्षीदार स्वत:हून सांगते की, तिने काय तक्रार दिली हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व तिच्या पतीने मला आज कोर्टात जावून साक्ष देण्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, कोर्टात कशी साक्ष द्यायची हे मला फिर्यादी व तिच्या पतीने सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, माझी जाऊ रुपा हिने दिलेल्या तक्रारीला मदत होण्यासाठी आजरोजी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. ०६/११/२०२५

न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.